विठोबा सीताराम परब वि.

प्रकाश नारायण डांगी व.४

## निशाणी क्रमांक ९९ वरील आदेश

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.1क राहुल प्रकाश डांगी यांचेविरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे मते, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.1क राहुल प्रकाश डांगी हे दि.१४.०८.२०२४ रोजी गांव मौजे कसाल, ता. कुडाळ येथे मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र.1क यांचे वारस ९० दिवसांचे आत रेकॉर्डवर आणणे गरजेचे होते. परंतु, प्रतिवादी क्र.1क राहुल प्रकाश डांगी हे मयत झाल्यानंतर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींची नावे व पत्ते वेळीच उपलब्ध न झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर दाखल करणेसाठी ६० दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.1क यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.1क यांचे कायदेशीर वारस मुदतीत सामील न करण्यामागे वादी यांचा कोणताही गैरहेतू नव्हता व नाही. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.1क यांचेविरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे, अर्ज कायदेशीर तरतुदी अंतर्गत नाही. त्यामुळे अर्ज खर्चासहित फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ वादी यांनी आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र.1क यांचेविरूध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुतकामी नि.111 कडे प्रतिवादी क्र.1क यांचे मृत्यू

प्रमाणपत्राची मुळ प्रत दाखल केलेली आहे. सदरील दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी क्र.१क यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्यामध्ये कोणतेही बदल होणारे नाहीत. तसेच प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब, अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम **रूपये २००/- (रु. दोनशे मात्र)** इतक्या खर्चाने मंजुर करणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादीने प्रतिवादी यांना अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र.१क यांचेविरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक:- ०७/०७/२०२६

( एन.ए.बकरे )

ठिकाण:- कुडाळ

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कुडाळ.